"हातमाग विणकर कुटुंबाना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज देण्याबाबत."

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः हातमाग-२०२३/प्र.क्र.६२/टेक्स-३**
नविन प्रशासकीय भवन, १४ वा मजला
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० नोव्हेंबर, २०२३.

**वाचा :**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दिनांक ०२.०६.२०२३. (परिच्छेद क्रमांक ७.४)

**प्रस्तावना :**

राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीस चालना देण्यासाठी दिनांक ०२.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहिर केलेले आहे. सदर धोरणाचे हातमाग विणकरांना उपजिविकेचे संरक्षण सुनिश्चित करुन हातमाग वस्त्रोद्योग विणकरांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्याच्या दृष्टिने अतिरिक्त प्रोत्साहन देणे हे एक उद्दिष्ट आहे. सदर धोरणातील परिच्छेद क्र. ७.४ मध्ये हातमाग विणकरांच्या कुटुंबाना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज देण्यात येईल असे नमूद केले आहे. सदर अनुषंगाने हातमाग विणकरांच्या कुटूंबाना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ नुसार हातमाग विणकरांना उपजिविकेचे संरक्षण सुनिश्चित करुन हातमाग वस्त्रोद्योग विणकरांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्याच्या दृष्टिने अतिरिक्त प्रोत्साहने देण्याच्या अनुषंगाने हातमाग विणकर कुटुंबाना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. **सदर योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबातील हातमाग विणकरांची पात्रता :-**

(अ) लाभार्थी हातमाग विणकर हा केंद्र शासनाच्या सर्वात अलीकडचे हातमाग अंतर्गत नोंदणीकृत विणकर असावा व त्यांच्याकडे तसे ओळखपत्र असावे.

(ब) एकाच कुटुंबात जास्त लाभार्थी असतील तर फक्त एकच लाभार्थी सदर योजनेसाठी अर्ज करु शकेल.

(क) अर्जाच्या दिनांकापूर्वी सहा महिन्यापासून विणकर व्यवसायात कार्यरत असावा. विणकाम करत असल्याचा मागील ६ महिन्याचा पुरावा म्हणून कच्चा माल खरेदीचे बील/पक्का माल विक्रीचे बील/महामंडळ,महासंघ अथवा संस्थेचा सभासद असल्यास सदर विणकरास विणकाम मजूरी दिल्याबाबत संबंधित संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

Scanned with OKEN Scanner

(ड) अर्जदाराकडे महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचा दाखला असणे आवश्यक.

(इ) लाभार्थी हातमाग विणकर कुटुंबाचे नावे वीज जोडणी असावी.

(ई) हातमाग विणकरांच्या कुटुंबाना दरमहा १ ते २०० युनिट पर्यंत (२०० युनिट) मोफत वीज शासनामार्फत देण्यात येईल त्यापेक्षा जास्त म्हणजे २०० युनिटच्या वर वापर झालेल्या बीलाची रक्कम स्वत: लाभार्थ्याला भरावी लागेल.

(उ) विणकर कुटुंबाने वीज बील देयकाची रक्कम नियमीत भरणा करणे गरजेचे राहिल. विलंब बील भरणा आकारणीची रक्कम शासनाकडून देय होणार नाही.

(ऊ) सदर योजनेतील लाभार्थी हातमाग विणकरांचा शासन यंत्रणेद्वारे नियमित आढावा घेण्यात येईल. सदर आढाव्यामध्ये हातमाग व्यवसाय सोडला असल्याचे आढळून आल्यास असा लाभार्थी वीज अनुदान सवलतीस पात्र राहणार नाही.

३. **योजनेची अंमलबजावणी :-**

(a) वरील पात्रता धारण करणारा व्यक्ती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये संबंधीत प्रादेशिक उपायुक्त यांचेकडे अर्ज सादर करतील.

(b) दरमहा प्राप्त झालेले अर्ज संबंधित प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग व विणकर सेवा केंद्र यांचे कार्यालयातील तांत्रिक अधिकारी / कर्मचारी हे सदर अर्जदार विणकर व्यवसाय करीत असल्याची स्थळ तपासणी करतील. संबंधित प्रादेशिक उपायुक्त (वस्त्रोद्योग) प्राप्त अर्जांची छाननी व तपासणी करुन आपल्या शिफारशींसह हातमाग विणकरांची यादी आयुक्त (वस्त्रोद्योग) वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांना मंजूरीसाठी सादर करतील.

(c) प्रादेशिक उपायुक्त,वस्त्रोद्योग यांचे कार्यालयाकडून प्राप्त अर्ज खालील गठीत समिती समोर ठेवण्यात येतील.

| | |
|---|---|
| (अ) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर - | अध्यक्ष |
| (ब) सहआयुक्त तांत्रिक, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर- | सदस्य सचिव |
| (क) मुख्यअभियंता, महावितरण कंपनी, नागपूर किंवा त्यांच्या प्रतिनिधी- | सदस्य |
| (ड) प्रादेशिक उप आयुक्त वस्त्रोद्योग ( संबंधित) - | सदस्य |
| (इ) उपसंचालक,विणकर सेवा केंद्र (संबंधित)- | सदस्य |
| (फ) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांचे प्रतिनिधी- | सदस्य |
| (ग) महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ (महाटेक्स) यांचे प्रतिनिधी- | सदस्य |

सदर समितीची बैठक दरमहा आयोजित केली जाईल. बैठकीमध्ये प्राप्त अर्जाची छाननी करून पात्र अर्जदारास वीज सवलत सुरू करण्यासाठी मान्यता देईल व पुढील कार्यवाहीसाठी महावितरण कंपनीला कळविण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

४. महावितरण कंपनीने प्रत्येक तिमाहीला देण्यात आलेली वीज सवलत विभागाकडे मागणी करावी. सदर रक्कम विभागाकडून महावितरण कंपनीला त्यांनी दिलेल्या खात्यावर आयुक्त वस्त्रोद्योग यांचे मार्फत RTGS/धनादेशाद्वारे वर्ग करण्यात येईल.

५. सदर योजनेकरीता " मागणी क्रमांक व्ही-२, लेखाशिर्ष-२८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०३) (०५) "एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत हातमाग विणकर कुटुंबाना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज योजना ( २८५१ ७४३६).३३,अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१११०१८४४५७०३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

Digitally signed by SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
Date: 2023.11.10 18:44:43 +05'30'

( श्रध्दा कोचरेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह,विधी व न्याय) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
५. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.
७. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. महालेखापाल ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०.वित्त विभाग(व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
११.नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर.
१४.अध्यक्ष तथा संचालक, महावितरण कंपनी, मुंबई.
१५.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ (महाटेक्स), मुंबई.



Scanned with OKEN Scanner

१६.अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.

१८. सर्व प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग),

१९. निवड नस्ती ( टेक्स-३).



Scanned with OKEN Scanner